


# HISTORY ANNUAL REPORT

2018-19

**SHRI SANT SAVTA MALI GRAMIN COLLEGE**


PROF. DINESH KACHKURE
ASSISTANT PROFESSOR

PROF. VIJAY PANDE
HEAD & ASSO. PROF.

# अनुक्रमणिका

अभ्यासक्रमपूर्व 3

अभ्यासक्रम फलकावर लावणे 3
वेळापत्रक 3
वार्षिक नियोजन 3
तासिका तत्वावरील पदासाठी मुलाखती 3
निकाल 4

अध्यापकवर्ग 4-5

कार्यभार 4
फॅकल्टी 4
अभ्यासपत्रिका विभागणी 5

प्रवेश 6

लिंगनिहाय प्रवेश 6
प्रजातीनिहाय प्रवेश 6

अभ्यासक्रमपूरक 7-11

अतिथी व्याख्याने 7-8
भित्तिपत्रके 9-10
शैक्षणिक सहल 11

इतर कार्यक्रम 12-14

हैदराबाद मुक्तिसंग्राम दिन 12
विद्यापीठस्तरीय वक्तृत्व स्पर्धा 13-14

दृकश्राव्य 15

विभागास भेट 15

नाणी संग्रह 16
बातमी प्रसिद्धी 17-20

## अभ्यासक्रमपूर्व

### अभ्यासक्रम फलकावर लावणे

महाविद्यालयाची सुरुवात हि 15 जून 2018 झाली. दि. 18 जुन 2018 रोजी प्रथम, तृतीय व पाचव्या सत्राचे इतिहास विषयाचे अभ्यासक्रम सूचना फलकावर इतिहास विभागामध्ये लावण्यात आले. 26 नोव्हेंबर 2018 रोजी दुसर्या, चौथ्या व सहाव्या सत्राचे अभ्यासक्रम सूचना फलकावर इतिहास विभागामध्ये लावण्यात आले.

### वेळापत्रक

दि. 25 जून 2018 रोजी प्रथम व द्वितीय सत्राचे वेळापत्रक विभागात लावण्यात आले. तसेच 8 **जुलै** 2018 रोजी विभाग, विभागप्रमुख व सहाय्यक यांच्या वेळापत्रकाच्या प्रती तयार करुन त्या विभागाच्या फाईलला लावण्यात आल्या. तसेच महाविद्यालयाच्या वेळापत्रक फाईलला लावण्यात आल्या.

### वार्षिक नियोजन

इतिहास विभागातर्फे घेण्यात येणाऱ्या कार्यक्रम उपक्रमाचे वेळापत्रक एप्रिल 2018 मध्ये तयार करण्यात आले. तर 18 ते 22 जुन 2018 या कालावधीत प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाचे इतिहास विषयाच्या अभ्यायक्रमाचे वार्षिक नियोजन तयार करण्यात आले.

### तासिका तत्वावरील पदासाठी मुलाखती

महाविद्यालयातील इतिहास विभागाचे दुसरे पद पुर्णवेळ नसल्याकारणाने ़दि 07 जुलै 2018 रोजी मुलाखती घेऊन भरण्यात आले सदरील जागेवर प्रा़ दिनेश रामनाथ कचकुरे यांची निवड करण्यात आली़ यावेळी प्रा़ विजय पांडे हे विषयतज्ज्ञ म्हणून, तसेच प्राचार्य डॉ. एस. आर. टकले हे उपस्थित होते.

### निकाल

2017-2018 मध्ये झालेल्या परीक्षांचे इतिहास विषयाचे निकाल ऑगस्ट महिन्यात काढण्यात आले.

## अध्यापकवर्ग



Mr. Vijay Ramrao Pande
M.A., M.Phil., SET.
Head & Associate Professor
Date of Joining: 20 Oct 2001



Dinesh Ramnath Kachkure
M.A., SET
Assistant Professor (CHB)
Date of Joining: 1 Aug 2017

| No | Name of the Faculty | Sex | Designation | Qualification | Date of Joining | Type of Appointment |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | PANDE VIJAY RAMRAO | Male | Associate Professor | M.A., M.PHIL., SET | 20/10/2001 | Permanent |
| 2 | KACHKURE DINESH RAMNATH | Male | Assistant Professor | M.A., SET | 1/8/2018 | CHB |

## कार्यभार

| Sr. No. | Name of Assist. Prof. | Papers | Work Load | TOTAL |
|---|---|---|---|---|
| 1 | PANDE VIJAY RAMRAO | 6 | 24 | **32** |
| 2 | KACHKURE DINESH RAMNATH | 2 | 8 | |

**अभ्यासपत्रिका विभागणी**

प्रथम व द्वितीय सत्राच्या अभ्यासपत्रिका (पेपर) ची विभागणी खालीलप्रमाणे करण्यात आली.

| | Prof. PANDE VIJAY RAMRAO(Head) |
|---|---|
| **Paper II** | History of Modern Maharashtra-(AD1818-AD1905) |
| **Paper IV** | Twentieth Century Maharashtra.( 1905-1960) |
| **Paper VI** | British Rule in India (A.D.1757-A.D.1857) |
| **Paper VIII** | History of Mughal India (A.D.1526-A.D.1707) |
| **Paper IX** | Historiography |
| **Paper X** | History of Indian National Movement (A.D.1885-A.D.1947) |
| **Paper XI** | History of India (A.D. 1757 – A.D. 1885) |
| **Paper XII** | Project work |
| **Paper XIII** | Fields of History (Archaeology, Museology and Tourism) |
| **Paper XIV** | Landmarks in the History of Modern World |
| **Paper XV** | Glimpses of the history of Marathwada |
| **Paper XVI** | Project work |

| | Prof. KACHKURE DINESH RAMNATH |
|---|---|
| **Paper I** | Shivaji and his times (AD 1630- AD 1707) |
| **Paper III** | History of Maratha- (1707-1818) |
| **Paper V** | History of India (Up to -BC 300) |
| **Paper VII** | History of India (BC 300- AD 650) |

# प्रवेश

## लिंगनिहाय प्रवेश

| Class | Male | Female | Total |
|---|---|---|---|
| BAFY | 48 | 38 | 86 |
| BASY | 27 | 11 | 38 |
| BATY (SUB) | 8 | 8 | 16 |
| BATY (MAIN) | 2 | 2 | 4 |

## प्रजातीनिहाय प्रवेश

| CLASS | SC | ST | OBC | NT | MINORITY | GEN | Total |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **BAFY** | 7 | 0 | 18 | 22 | 0 | 39 | 86 |
| **BASY** | 4 | 0 | 6 | 5 | 0 | 23 | 38 |
| **BATY (Sub)** | 3 | 0 | 2 | 2 | 0 | 9 | 16 |
| **BATY (Main)** | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 4 | 4 |

## अभ्यासक्रमपूरक

### अतिथी व्याख्यान

- **पहिले:** 11 सप्टेंबर 2018 रोजी, आशुतोष पाटिल, औरंगाबाद यांचे अतिथी व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. शिवकालीन नाणी या विषयाचे बी. ए. प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांना अध्यापन करण्यात आले. यावेळी 50 विद्यार्थी हजर होते.




- अतिथी व्याख्यान

## अभ्यासक्रमपूरक

### अतिथी व्याख्यान

- **दुसरे**: 9 जानेवारी 2019 रोजी डॉ कृष्णा मालकर यांचे अतिथी व्याख्यान आयोजित करण्यात आले. यावेळी त्यांनी महात्मा गांधी या विषयाचे बी. ए. प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांना अध्यापन केले. यावेळी 20 विद्यार्थी हजर होते.




- अतिथी व्याख्यान: डॉ कृष्णा मालकर अध्यापन करतांना

## अभ्यासक्रमपूरक

### भित्तिपत्रक

- **पहिले:** 12 सप्टेंबर 2018 रोजी जयश्री वाघ, पूजा प्रधान, मोनाली उबाळे, अश्विनी बनसोडे, शिवानी चंद्रे, सचिन जाधव, अजिनाथ निराशे या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक स्थिती या भित्तिपत्रकांचे प्रकाशन श्री आशुतोष पाटील, प्रा. दिनेश कचकुरे व ज्ञानेश्वर थोरे यांच्या हस्ते करण्यात आले.




- सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक स्थिती या भित्तिपत्रकांचे प्रकाशन करतांना प्रा. दिनेश कचकुरे व ज्ञानेश्वर थोरे



## भित्तिपत्रक

- **दुसरे**: 20 फेब्रुवारी 2019 रोजी सोमिनाथ सहाने, निवृत्ती गाडेकर या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या पानिपतच्या लढाया याभित्तिपत्रकाचे प्रकाशन प्रा डॉ. केशव लहाने, प्रा. काकासाहेब डक यांच्या हस्ते करण्यात आले.




- पानिपतच्या लढाया या भित्तिपत्रकाचे प्रकाशन करतांना प्रा डॉ. केशव लहाने, प्रा. काकासाहेब डक

### शैक्षणिक सहल

06 फेब्रुवारी 2019 रोजी श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तू संग्रहालय, औरंगाबाद येथे शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले होते. यात प्रा. दिनेश कचकुरे, डॉ. रामकिशन लोमटे, प्रा. बाबासाहेब लहाने यांसह 27 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यावेळी प्रा. दिनेश कचकुरेनी श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तू संग्रहालयात  माहिती दिली.




- शैक्षणिक सहल: श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तू संग्रहालय, औरंगाबाद

## इतर कार्यक्रम

### हैदराबाद मुक्तिसंग्राम दिन

दि. 17 सप्टेंबर 2018 रोजी हैदराबाद मुक्तिसंग्राम दिनानिमित्ताने महाविद्यालयात सकाळी 9.00 वाजता हैद्राबाद मुक्तीसंग्राम: भारतीय स्वातंत्र्याची परिपूर्ती याविषयावर प्रा. दिनेश कचकुरे , सावता माळी महाविद्यालय, फुलंब्री यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. त्यांनी हैद्राबाद मुक्तीलढा हा भारतीय स्वातंत्र्य संग्रामनंतर झालेला अभूतपूर्व असा लढा होता. भारताच्या सार्वभौमत्वाला आणि अखंडतेला धोका निर्माण झाला होता. निजामाच्या अन्यायी व अत्याचारी राजवटीच्या विरोधात संस्थानातील जनतेने व्यापक जनसंघर्ष केला. यामुळे भारतीय स्वातंत्र्याचे स्वप्न परिपूर्ण स्वरुपात प्रत्यक्षात उतरविण्याच्या दृष्टीने हैद्राबाद मुक्तीलढ्याचे ऐतिहासिक महत्व आहे. सातवा निजाम मीर उस्मान आलीखान आणि त्याची रझाकारी फौज यांच्या विरोधात हा लढा लढला गेला. अवघ्या तीनच दिवसात १७ सप्टे.१९४८ रोजी निजाम भारतीय सैन्याला शरण आला. यामुळे भारतीय स्वातंत्र्याच्या भौगोलिक सलगतेला परिपूर्णता प्राप्त झाली. राजकीय स्वातंत्र्याबरोबरच संस्थानातील जनतेच्या सांस्कृतिक, धार्मिक, भाषिक, स्वातंत्र्याची परिपूर्ती झाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य. डॉ. एस. आर. टकले हे होते. प्रास्ताविक प्रा. विजय पांडे यांनी तर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. बाबसाहेब लहाने यांनी केले.

हैद्राबाद मुक्तिसंग्राम दिन: व्याख्यान




हैदराबाद मुक्तिसंग्राम दिनः 17.9.2018- वक्ते- प्रा. दिनेश कचकुरे इतिहास विभाग

## विद्यापीठस्तरीय वक्तृत्व स्पर्धा

20 फेब्रुवारी 2018 रोजी छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्ताने विद्यापीठस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत जे. इ. एस. महाविद्यालय, जालना राजर्षी शाहू महाविद्यालय पाथ्री, उषाताई फार्मशी कॉलेज, पाथ्री, श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री, विवेकानंद महाविद्यालय औरंगाबाद, राजीव गांधी महविद्यालय, करमाड, अशा विविध महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. या स्पर्धेत **प्रथम** हर्षल अंबादास व्यवहारे, जे. इ. एस. महाविद्यालय, जालना, **द्वितीय** लहाने कोमल रोहिदास, राजर्षी शाहू महाविद्यालय पाथ्री, **तृतीय** स्वप्निल दामोदर बोडले, राजर्षी शाहू महाविद्यालय पाथ्री, **उत्तेजनार्थ** लक्ष्मीकांत ढेपले, श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री, **उत्तेजनार्थ** गायके सुनील, विवेकानंद महाविद्यालय, औरंगाबाद यांनी बक्षिसे मिळवली. परीक्षक म्हणून डॉ. एम. एम. नळगीरकर, डॉ. महेश थोरात यांनी काम पाहिले.




विद्यापीठस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत सहभागी स्पर्धक




## विभागास भेट




संस्थेचे सन्माननीय संचालक मंडळ विभागास भेट देतांना- श्री शामसुंदरजी नाईक, श्री रामनाथजी कचकुरे, श्री देवजीभाई पटेल

# दृकश्राव्य माध्यम











इतिहास विभागाद्वारे सर्व पेपेरची शिकवणी **PPT** व **VIDEO** द्वारे करण्यात आली.

तसेच विद्यार्थ्यांनी **सेमिनारही** घेतले.

### नाणी संग्रह

महाविद्यालयातील नाणी ही विद्यार्थ्यांनी जमा केलेली आहेत. ही नाणी अध्यापनासाठी वापरली जातात. तसेच विद्यार्थीही त्यांचे अवलोकन करतात. श्री संत सावता गुरुकुलातील शिक्षकही ती अध्यापनांसाठी वापरतात.

### सामंजस्य करार

महाविद्यालयाचा इतिहास विभाग व राजर्षी शाहू महाविद्यालय पाथ्री यांच्यात झालेल्या सामंजस्य करारानुसार 20 फेब्रुवारी 2019 रोजी विद्यापीठस्तरीय वक्तृत्व स्पर्धा संपन्न झाली.

# बातमी प्रसिद्धी



देशोन्नती

वैचारिक क्रांतीचा अग्रदूत

नांदेड शनिवार, दि. १५ सप्टेंबर २०१८ पृष्ठे ८+४ मूल्य ₹:३

## विद्यार्थ्यांनी हाताळली शिवकालीन नाणी

**तालुका प्रतिनिधी / १४ सप्टेंबर**

**फुलंब्री :** सावता माळी महाविद्यालयातील इतिहास विभागातर्फे स्वराज्याचे चलन या विषयावर अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी आशुतोष पाटील यांनी प्राचीन नाण्यांचा निर्मितीपासून आधुनिक कालखंडातल्या नाण्यांपर्यंतचा नाण्यांचा प्रवास उलगडून दाखवला. त्यांच्या संग्रही असलेल्या ५ हजारपैकी अनेक नाण्यांचा इतिहास विद्यार्थ्यांनी समजून घेतला. याप्रसंगी पाटील यांनी आहत नाणी, परकीय आक्रमकांची नाणी, कुशान, सातवाहन, यादव, मुगल घराण्यांची नाणी या नाण्यांचा आढावा घेऊन स्वराज्यातील छत्रपती शिवाजी महाराजांनी काढलेल्या होन, शिवराई आदी विषयांवर प्रकाश टाकुन नाण्यांचा आकार, नाण्यांचा धातू, नाण्यांवरील प्रतिमा, नाण्यावरील अक्षरे, नाण्यावरील इसवीसन, टाकसाळीत नाण्यांची निर्मिती, एकाच राजाचे अनेक प्रकारची नाणी आदी विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. याप्रसंगी प्रा. विजय पांडे, प्रा. दिनेश कचकुरे, डॉ. पांडुरंग कल्याणकर, मुख्याध्यापक ज्ञानेश्वर थोरे, डॉ. संजीवकुमार पांचाळ, इतिहास विभागाचे विद्यार्थी व संत सावता गुरुकुलाचे विद्यार्थी उपस्थित होते.

सकाळ औरंगाबाद, रविवार, १६ सप्टेंबर २०१८



फुलंब्री : सावता माळी ग्रामीण महाविद्यालयात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना आशुतोष पाटील.

# ‘स्वराज्याचे चलन’वर फुलंब्री येथे व्याख्यान

फुलंब्री, ता. १५ (बातमीदार) : येथील सावता माळी महाविद्यालयात आशुतोष पाटील यांचे ‘स्वराज्याचे चलन’ या विषयावरील व्याख्यान नुकतेच पार पडले. महाविद्यालयाच्या इतिहास विभागातर्फे व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. श्री. पाटील यांनी प्राचीन नाण्यांच्या निर्मितीपासून आधुनिक कालखंडातल्या नाण्यांपर्यंतचा नाण्यांचा प्रवास उलगडून दाखविला. त्यांच्या संग्रही असलेल्या ५००० पैकी अनेक नाण्यांचा इतिहास विद्यार्थ्यांनी समजून घेतला. या प्रसंगी पाटील यांनी आहत नाणी, परकीय आक्रमकांची नाणी, कुशान, सातवाहन, यादव, मुगल घराण्यांची नाणी आदींचा आढावा घेऊन स्वराज्यातील छत्रपती शिवाजी महाराजांनी काढलेल्या होन, शिवराई आदी विषयांवर प्रकाश टाकून नाण्यांचा आकार, नाण्यांचे धातू, नाण्यांवरील प्रतिमा, नाण्यांवरील अक्षरे, नाण्यांवरील इसवी सन, टाकसाळीत नाण्यांची निर्मिती, एकाच राजाचे अनेक प्रकारची नाणी आदी विषयांवर माहिती दिली. या वेळी प्रा. विजय पांडे, प्रा. दिनेश कचकुरे, डॉ. पांडुरंग कल्याणकर, मुख्याध्यापक ज्ञानेश्वर थोरे, डॉ. संजीवकुमार पांचाळ यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.



# हैदराबाद मुक्तीसंग्राम लढा हा भारत स्वातंत्र्याची परिपूर्ती - प्रा. दिनेश कचकुरे

## मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन जिल्ह्यात उत्साहात साजरा

**फुलंब्री :** शहरातील श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयात प्रा. दिनेश कचकुरे यांनी हैदराबाद मुक्तीसंग्राम लढा भारत स्वातंत्र्याची परिपूर्ती असल्याचे असे प्रतिपादन केले. हैदराबाद मुक्तीसंग्राम दिनाच्या निमित्ताने दि. १७ रोजी इतिहास विभागातर्फे आयोजित व्याख्यानाच्या कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस आर टकले हे होते.

पुढे बोलतांना कचकुरे म्हणाले की, दिल्लीतील केंद्र सत्ता दुर्बळ झाल्यानंतर अनेक प्रांतीय सत्ता निर्माण झाल्या. त्यात हैदराबाद राज्य हेही होते. शेवटचा निजाम मीर उस्मान अली याच्या काळात भारतीय स्वातंत्र्याची चळवळ चालू झालेली होती. ती चळवळ हैदराबाद राज्यातही चालू झाली. हैदराबाद राज्यात रझाकारांनी घातलेला धुमाकूळ, पुढे त्या विरुद्ध हैदराबाद राज्यातील जनतेने सुरू केलेली आंदोलने ही महत्त्वाचे ठरली. गोविंद पानसरे, स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ, माणिकचंद पहाडे, दगडाबाई शेळके यांनी हा लढा पुढे नेण्याचे काम केले. पुढील कालखंडात भारत सरकारने विशेषतः तत्कालीन गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी हे राज्य भारतात विलीन करण्यासाठी विशेष प्रयत्न केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. विजय पांडे यांनी प्रयत्न केले.

**अंधारमळा शाळेत मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन उत्साहात साजरा**

गल्लेबोरगाव : अंधारमळा येथील जि.प. शाळेत दि. १७ रोजी मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी प्रथम महापुरुषांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून ध्वजाचे पूजन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खंडूजी फुलारे, रामदास वीर, शाळेचे

**देशोन्नती**

वैचारिक क्रांतीचा अग्रदूत

नांदेड बुधवार, दि. १९ सप्टेंबर २०१८ पृष्ठे ८+४ मूल्य ₹ ३



**देशोन्नती**

नांदेड / शनिवार, दि. १५ सप्टेंबर २०१८

## इतिहासाच्या भित्तीपत्रकाचे प्रकाशन

तालुका प्रतिनिधी / १४ सप्टेंबर

**फुलंब्री :** शहरातील संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयात इतिहास विभागातर्फे बी.ए प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास या अभ्यास पत्रिकेतील सामाजिक, धार्मिक व आर्थिक स्थिती या विषयावर तयार केलेले भित्तीपत्रक १२ सप्टेंबर रोजी प्रकाशित करण्यात आले होते. आशुतोष पाटील, प्रा. विजय पांडे, प्रा. दिनेश कचकुरे यांच्या हस्ते या भित्तीपत्रकाचे प्रकाशन करण्यात आले. हे भित्तीपत्रक तयार करण्यासाठी जयश्री वाघ, पूजा प्रधान, मोनाली उबाळे, आश्विनी बनसोडे, शिवानी चंद्रे, सचिन जाधव, आजिनाथ निराशे या विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

सकाळ औरंगाबाद, बुधवार, १९ सप्टेंबर २०१८



फुलंब्री : सावता माळी महाविद्यालयात महापुरुषांना अभिवादन करताना प्रा. दिनेश कचकुरे, प्राचार्य डॉ. सुभाष टकले.

# मराठवाडा मुक्तिसंग्राम हा भारतीय स्वातंत्र्याची परिपूर्ती : प्रा. दिनेश कचकुरे

फुलंब्री, ता. १८ (बातमीदार) : मराठवाडा मुक्तिसंग्राम लढा हा भारतीय स्वातंत्र्याची परिपूर्ती असल्याचे प्रा. दिनेश कचकुरे यांनी सांगितले. येथील श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयात सोमवारी (ता.१७) मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त इतिहास विभागातर्फे आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सुभाष टकले होते.

प्रा. कचकुरे म्हणाले की, दिल्लीतील केंद्र सत्ता दुर्बल झाल्यानंतर अनेक प्रांतीय सत्ता निर्माण झाल्या. त्यामध्ये हैदराबाद राज्य हेही होते.

या राज्यात एकूण सात निजाम होऊन गेले. त्यापैकी शेवटचा निजाम मीर उस्मान अली याच्या कालखंडात भारतीय स्वातंत्र्याची चळवळ चालू झालेली होती. ती चळवळ हैदराबाद राज्यातही चालू झाली. हैदराबाद राज्यात रझाकारांनी घातलेला धुमाकूळ. पुढे त्या विरुद्ध हैदराबाद राज्यातील जनतेने सुरू केलेली आंदोलने ही महत्त्वाची ठरली. गोविंद पानसरे, स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ, माणिकचंद पहाडे, दगडाबाई शेळके यांनी हा लढा पुढे नेण्याचे काम केले.

पुढील कालखंडात भारत सरकारने विशेषतः तत्कालीन गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी हे राज्य भारत राष्ट्रात विलीन करण्यासाठी विशेष प्रयत्न केले. ऑपरेशन पोलोअंतर्गत पोलिस कृती करून हे राज्य सामील करून घेतले. यासाठी प्रा. विजय पांडे यांनी पुढाकार घेतला.